**प्रेसेनाट दि.१६/०३/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन, पुणे**

**येरवडा पोलीस स्टेशनचे चोरीचे गुन्ह्यात सुमारे दीड वर्षापासून फरारी असलेल्या आरोपीस येरवडा पो.स्टे.कडून सोलापूर येथून अटक करण्यात आले.**

---

एक फिर्यादी महिला, वय ३० वर्षे, रा.गंगाधाम,कोंढवा,पुणे यांनी दि.११/११/२०१७ रोजी सायं.१७:३० ते १९:०० वा.चे दरम्यान क्लाऊड नाईन हॉस्पिटल बी.एन.कल्याणी बंगल्याजवळ, कल्याणीनगर, पुणे चे समोरील रस्त्यावर त्यांची टीव्हीएस ज्युपीटर गाडी पार्क करून ठेवलेली असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने डीग्गी उघडून त्यामधून एक निळ्या रंगाची पर्स, त्यामध्ये ॲक्सिस बँकेचे एटीएम कार्ड, एसबीआय बँकेचे एटीएम कार्ड, आयसीआयसीआय बँकेचे एटीएम कार्ड, एक पॅनकार्ड, ड्रायव्हींग लायसन्स व रोख १०००/- रू. असा माल चोरून नेला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि.१२/११/२०१७ रोजी येरवडा पो.स्टे.येथे गुन्हा रजि.नं. ८४१/२०१७ भा.दं.वि.क. ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदर गुन्ह्यातील निष्पन्न झालेला आरोपी राकेश रमेश गदगे हा सोलापूर येथे असल्याची माहिती मिळून आल्याने, श्री.राजेंद्र कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पो.स्टे. यांनी व वरील गुन्ह्याचे तपास अधिकारी श्री.बलभिम ननवरे, स.पो.निरी. यांनी आरोपीचे शोधासाठी तपास पथकातील सहा.पो.फौजदार ख्रिस्तोपर मकासरे व पो.शि.७३७७ गणेश वाघ असे पथक तयार करून त्यांना तपासाबाबत मार्गदर्शन करून रवाना केले होते. त्याप्रमाणे सहा.पो.फौजदार ख्रिस्तोपर मकासरे व पो.शि. ७३७७ गणेश वाघ यांनी सोलापूर येथे जावून आरोपीबाबत माहिती काढून त्याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेवून पुणे येथे आणून हजर केले. तपास अधिकारी स.पो.नि.ननवरे यांनी सदर आरोपी- राकेश रमेश गदगे, वय २७ वर्षे, रा.विश्व गणपतीचे मागे,१० सोमवार पेठ,सोलापूर यास दि.१५/०३/२०१९ रोजी ११:५५ वा. वरील गुन्ह्यात अटक केली आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.राजेंद्र कदम व स.पो.निरी. बलभिम ननवरे यांचे मार्गदर्शनाप्रमाणे स.पो.फौज.ख्रिस्तोफर मकासरे व पो.शि. ७३७७ गणेश वाघ यांनी चोरीचे गुन्ह्यात सुमारे दीड वर्षापासून फरारी असलेल्या आरोपीस सोलापूर येथे जावून माहिती काढून त्याचा शोध घेऊन त्यास ताब्यात घेऊन पुणे येथे आणून दाखल गुन्ह्यात अटक करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

( **राजेंद्र कदम** )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे